**ग्रामपंचायत व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद कोल्हापूर.**
**पंचगंगा नदीखोरे प्रदूषण माहे ऑगस्ट २०१६ अखेर**

**संक्षिप्त टिपणी**

पंचगंगा नदी खो-यातील १७४ ग्रामपंचायती पंचगंगा नदी प्रदुषणास कारणीभुत असल्याचे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यानी कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राथमिक सर्व्हेक्षण केले असता असे निदर्शनास आले आहे की, वरील १७४ ग्रामपंचायती पंचगंगा नदीच्या खो-यामध्ये वसलेल्या असल्या तरी प्रत्यक्षात २३ ग्रामपंचायतीचे सांडपाणी कायमस्वरुपी पंचगंगा नदीमध्ये मिसळत आहे उर्वरित १६ ग्रामपंचायतीचे अंशत: सांडपाणी हे कायम स्वरुपात पंचगंगा नदीमध्ये मिसळत असल्याचे दिसून आले आहे. अशी एकूण ३९ गांवे प्रामुख्याने पंचगंगा नदी प्रदुषणास कारणीभुत आहेत.

- पंचगंगा नदी खो-यामधील संभाव्य गांवे **:- १७४**
- पंचगंगा नदी प्रदुषाणास कायमस्वरुपी करणीभुत असणारी एकूण गांवे **:- ३९ ( यळगुड ता. हातकणंगले सह )**
  - अ) कायम स्वरुपी सांडपाणी मिसळणारी गांवे **- २३**
  - ब) अंशत: कायमस्वरुपी सांडपाणी मिसळणारी गांवे **- १६**
- पंचगंगा नदी खो-यामधील प्रदुषण बारमाही न करणारी एकूण गांवे (Seasonal) **:-१३५**
- जिल्हा परिषद कोल्हापूर कडून पंचगंगा नदी प्रदुषण रोखण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु **:- दि. १४ एप्रील २०१२**
- ३९ गावांचा सविस्तर प्रकल्प अहवाल( Detailed Project Report) व १३५ गावांचा प्राथमिक सर्व्हेक्षण अहवाल (Pre Feasiblity report) तयार करण्यासाठी संस्थेची अतिम निधीची तज्ञ समितीकडून शिफारस **:- दि. २३ ऑगष्ट २०१२**
- अंतिम निवडलेल्या संस्थेकडून प्राप्त देकार
  - अ) ३९ गावासाठी D.P.R (Detailed Project Report) व
  - ब) १३५ गावासाठी P.F.R.(Pre Feasiblity report) तयार करणे **:-रु. ३७.५० लक्ष**
- प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा शुल्क ( Project Management Consultancy) **:-रु. ६०.०० लक्ष**

**अ) पंचगंगा नदी प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक निधी**

१) Primove Infrastructure Development Consulatant Pune कंपनीस देय रक्कम :-**रूपये ३७.५०लक्ष**

**ब) पैकी अ साठी प्राप्त निधी -**

**१)** जि.प. अंदाजपत्रक सन २०१३-१४ अंदाजपत्रक तरतूद :- **रूपये २०.०० लक्ष**

**२)** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त निधी :- **रूपये १७.५० लक्ष**

**एकूण प्राप्त निधी** :- **रूपये ३७.५० लक्ष**

Primove Infrastructre Development Consulatant Pune या कंपनीच्या देकारानुसार सदरचे काम सुरू करणेसाठी जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती कडून कार्यारंभ आदेश देणेस दिनांक २०/१२/२०१२ चे खास सभेत मान्यता मिळाली असून त्याप्रमाणे Primove Infrastructre Development Consulatant Pune कंपनीस दिनांक १०/१/२०१३ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आला आहे.

त्याप्रमाणे सदर कंपनीने ३९ ग्रामपंचायतीचे प्राथमिक माहिती सर्व्हेक्षण करणेचे काम हाती घेवून पुर्ण केले असून ३० गावांचा सांडपाणी व ३६ गावांचा घनकचरा व्यवस्थापनाचा ३१ मे २०१३ अखेर जि. प. कडे सादर केला आहे. सदर गावांचे DPR पंचगंगा नदी प्रदूषण निर्मुलन सुकाणू समितीच्या दिनांक १८/६/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ ठेवले होते. सदर बैठकिमध्ये सर्वंकष चर्चा होवून DPR मधील कांही त्रुटी / दुरूस्त्या करणे बाबत समितीने कंपनीस सांगितले. सदर त्रुटी / दुरूस्तीचे काम Primove Infrastructre Development Consulatant Pune कंपनीमार्फत त्याची जि.प. ग्रा. पा. पु. विभागामार्फत छाननी करून ३० गावांचा सांडपाणी व ३६ गावांचा घनकचरा व्यवस्थापनाचा रू. १३९.९४ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडे प्रशासकिय मान्यतेसाठी व निधी उपलब्ध करून घेणेसाठी दि.०२/०९/२०१३ अन्वये सादर करणेत आला आहे.

तसेच सदर सविस्तर प्रकल्प अहवालाचे मा. प्रधान सचिव (पर्यावरण) महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४/१२/२०१३ रोजी सादरीकरण करणेत आलेले आहे. तथापि पर्यावरण विभागाकडून देखभाल दुरूस्ती कमी करून Sustainable प्रकल्प करणेबाबत सुचित केलेनुसार फेरप्रस्ताव शासनास दि. २७-०२-२०१४ अन्वये सादर केला आहे. सदर सुधारित प्रकल्प अहवालाची सुधारीत अंदाजपत्रकीय किंमत रु. १०८.९३ कोटी इतकी आहे

- पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि २४/११ /२०१४ च्या पत्रान्वये १०८.९३ कोटी रूपये किंमतीचा प्रस्ताव उप संचालक, पर्यावरण विभाग दिल्ली यांचेकडे सादर केला आहे, याबाबत केंद्र शासनाकडून काही शेरे उपस्थित केलेले होते. सदरचा शेरे पुर्तता देखील इकडील कार्यालयाने दि. ०२-०३-२०१५ अन्वये पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना सादर केली आहे, परंतु केंद्र शासनाने निधी अभावी सध्या फक्त अतिप्रदुषीत शहरी भागांचे प्रस्ताव हाती घेत असलेने इकडील कार्यालयाचा मुळ प्रस्ताव परत पाठवलेला आहे.

यास अनुसरुन इकडील कार्यालयाने संचालक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना सदर बाबत मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. १८३ /२०१२ दाखल असलेने सदर प्रस्तावास मंजुरी व निधी मिळणेबाबत केंद्र शासनास शिफारस करणे विषयी दि.२७-०८-२०१५ अन्वये विनंती केली आहे. तसेच प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनाही दि.२७-०८-२०१५ अन्वये पहिल्या टप्यातील १०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांमधील सांडपाणी प्रकल्पाचे नाबार्ड अंतर्गत समावेश करुन त्यास मंजुरी व निधी मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

- मा.मुख्य अभियंता, मजीप्रा नागरी व ग्रामीण पुणे यांना संक्षिप्त टिपणीसह Line estimate, लोकसंख्या इ. आवश्यक कागदपत्रासह नाबार्ड अंतर्गत समावेश करुन त्यास मंजुरी व निधी मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांना पहिल्या टप्यातील ३९ गावांपैकी ६ लोकसंख्येने मोठे असलेल्या व इतर

कोडोली ता.पन्हाळा अशा एकूण ७ गावांचा समावेश आहे पैकी शिरोली ता.हातकणंगले व कोडोली ता.पन्हाळा या दोन गावांच्या निविदा कार्यवाही पूर्ण झालेली असलेने तात्काळ कामाचा आदेश देवून कायम स्वरुपी उपाययोजना पूर्ण करणेबाबत दि. ७-९-२०१५ च्या अर्धशासकीय पत्राने विनंती करणेत आलेली आहे.

● या व्यतिरिक्त राज्य नदीसंवर्धन सचिव प्रदत्त समितीच्या दि.१ आक्टोंबर २०१५ रोजीच्या मा.अप्पर मुख्य सचिव पर्यावरण विभाग मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये पहिल्या टप्यातील ३९ गावांच्या सांडपाणी घनकचरा व्यवस्थापनाचे व इकडील कार्यालयामार्फत केलेल्या तात्पुरत्या उपाययोजनांचे सादरीकरण करुन पर्यावरण विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करणेत आलेली आहे.

तथापी राज्य नदीसंवर्धन सचिव प्रदत्त समितीच्या दि.१ आक्टोंबर २०१५ रोजीच्या इतिवृत्ताप्रमाणे मा.अप्पर मुख्य सचिव पर्यावरण विभाग मुंबई यांनी सदरचा प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे सादर करुन निधी उपलब्ध करुन घेणेबाबत सुचित केलेप्रमाणे मा.प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

तरी केंद्र शासन / पर्यावरण विभाग / मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणी पुरवठा विभागाकडून सदरच्या प्रस्तावास अदयाप मंजुरी नसुन निधी उपलब्ध झालेला नाही. तसेच मा. उच्च न्यायालय यांनी कळवलेप्रमाणे इकडील प्रशासनामार्फत **तात्पुरत्या उपायायोजना** वेळोवेळी करणेत येत आहेत.

● **मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जिल्हा परिषदेने पंचगंगा खो-यातील ग्रामपंचायतीकडून सदरच्या सर्व उपाययोजना**

१) संबधीत सर्व गावांमध्ये प्रभात फेऱ्या / पथनाट्ये द्वारे / महिला मेळावे / शाळांमध्ये स्पर्धा घेवून जनजागृती करणेत येत आलेली आहे.

२) गावांमध्ये मुख्य ठिकाणी नदी प्रदुषण न करणेबाबत ठळक फलक लावणेत आलेले आहेत.

३) उत्सव काळामध्ये मुर्ती दान करणे / मुर्ती कृत्रीम तलावामध्ये विर्सजन करणेत येत आहे. तसेच निर्माल्य विर्सजन नदी पात्रामध्ये न करता त्यासाठी कुंड / खडे करणेत आलेले आहेत.

४) रक्षा विर्सजन नदीमध्ये न करता मूठभर रक्षा - श्रध्देसाठी ही संकल्पना राबवून रक्षा विर्सजन शेतामध्ये करणेत येते. तरी काही गांवामध्ये संबधीतास प्रोत्साहन अनुदान देणेत येते.

५) नदीपात्रामध्ये वाहने, जनावरे व कपडे न धुणेसाठी नांगारिकास बंदी करणेत आलेली आहे, अडथळे करणेत येत आहेत.

६) नदीमध्ये सांडपाणी मिसळू नये यासाठी नाल्यांवर साखळी बंधारे, खड्डे काढून सांडपाण्याचा शेतीसाठी वापर करणेत येत आहे.

७) घनकचरा एकत्रीत करणेसाठी घंटागाडीद्वारे घनकचरा गोळा केला जातो, खड्डे घेवून कच-याचा खत करणेत येत आहे.

- पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन प्रदूषणाबाबतच्या तक्रारी व अडचणी निवारणार्थ टोल फ्री नं. १८००२३३१२१५ प्रसिध्द करुन आवाहन केले आहे.

- मा. उच्च यायालयाने सूचीत केलेल्या तात्पुरत्या उपाययोजना संबंधीत ग्रामपंचायतीकडून करुन घेऊन सदर उपाययोजनामध्ये सातत्य टिकवून ठेवण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः व सर्व खातेप्रमुखांकडून प्रत्येक गावाला भेट देवून गावात त्याबाबत जनजागृती केलेली आहे.

- याव्यतिरिक्त श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे सांडपाणी घाकचरा व्यवस्थापनाचा स्वतंत्र प्रस्ताव RBC (rotating biological contractors) या तंत्रज्ञानाचा वापर असलेला रु. २९३.२० लक्ष अंदाजपत्रकीय रक्कमेचा प्रस्ताव मंजूरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळास दि. ७-८-२०१४ अन्वये सादर करणेत आलेला आहे व सध्या सदरचा प्रस्ताव श्री. क्षेत्र नृसिंहवाडी कन्यागत महापर्व २०१६-१७ च्या दुस-या टप्या मध्ये प्रस्तावीत करणेत आलेला आहे.

- दि.०५ जुन २०१५ रोजी पर्यावरण दिनानिमीत्य चला पंचगंगा वाचवूया नदी परिक्रमा सकाळ समुहा समवेत करुन जलदिंडीचे आयोजन केले. या नदी परिक्रमेमध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत संबंधीत तालुक्यातील गट विकास अधिकारी, उप अभियंता (ग्रा.पा.पु), जिल्हा परिषद पदाधिकारी/सदस्य, पंचायत समिती पदाधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्था समवेत करणेत आली. सदर नदी परिक्रमे दरम्यान संपुर्ण पंचगंगा खो-यामध्ये गाव स्वच्छता, नदी घाट स्वच्छता, सभा, प्रतिज्ञा असे कार्यक्रम घेणेत येवून नागरिकामध्ये जागृती करणेत आली.

तसेच वरील प्रमाणे यावर्षी देखील सालाबादाप्रमाणे येणा-या गौरीगणपती घरगुती / सार्वजनीक उत्सवामध्ये पाण्याचे स्त्रोत्र, नदी, हवा व ध्वनी प्रदुषण होण्याची शक्यता असल्याने मा. उच्च न्यायालयाने सुचीत केलेल्या सर्व तात्पुरत्या उपययोजनांचे सातत्य ठेवून त्याचा कृती आराखडा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), गट विकास अधिकारी, उप अभियंता ग्रा.पा.पु. व संबंधीत ग्रामपंचायतींना सादर करणेबाबत दि.१७ /०८/२०१५ अन्वये कळवणेत येऊन त्याप्रमाणे पूर्वनियोजन करणेसाठी आदेश देणेत आले तसेच यासाठी गावनिहाय कर्मचारी / अधिकारी नियुक्त करुन सदर घरगुती / सार्वजनिक उत्सवा दरम्यान श्रीगणेश मुर्ती / निर्माल्य विर्सजनासाठी पर्यायी सुविधा उदा. कायली / कुंड ठेवून त्यामध्येच मुर्ती / निर्माल्य विर्सजन करणेसाठी अवाहन करणेत आले.

- जिल्हा परिषदेने केलेल्या नियोजनाप्रमाणे नदी काठावरील ३९ गावांमध्ये ८४ कायली / कुंड व १२५ ट्रॅक्टर्स / ट्रॉली ठेवणेत आले. व नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनी विर्सजनाच्या दिवशी थांबून पूर्वनियोजन केलेने विर्सजना दरम्यान नागरिकांनी उत्सफुर्त प्रतिसाद देऊन **४५३६२ घरगुती श्रीगणेश मुर्ती व १०७ ट्रॉली निर्माल्य** सदर कायली / कुंडामध्ये विर्सजन करुन जमा करणेत आले. तसेच नदी काठावरील ३९ गावां व्यतिरिक्त जिल्हयातील ७५९ गावांनी प्रतिसाद देऊन भाग घेतला. त्यासाठी १४७० कायली / कुंड, ३६९ ट्रॅक्टर्स / ट्रॉलींची इत्यादी पर्यायी व्यवस्था तयार करणेत आली. या पर्यायी व्यवस्थेमध्ये **१३६२८५ घरगुती / ७९५ सार्वजनिक श्रीगणेश मुर्ती व ८०९ ट्रॉली**

निर्माल्य विर्सजित करुन दान करणेत आले या सर्व मुर्तीचे वापरात नसलेल्या खण / विहीर इत्यादी ठिकाणी विर्सजन करणेत आले व खड्डे करुन निर्माल्याचे कंपोष्ट खत करणेसाठी देणेत आले.

या सर्व उपक्रमास जिल्हा परिषदेच्या प्रयत्नांना व अवाहनास नागरिकांनी उत्सफूर्त प्रतिसादामुळे जिल्हयामध्ये एकूण **घरगुती / सार्वजनिक १८२४४२ श्रीगणेश मुर्ती व ९१६ ट्रॉली निर्माल्य नदी पात्रात विर्सजन न झालेने सार्वजनिक उत्सवा दरम्यान देखील प्रदुषण कमी होण्यास मदत होऊन नदीचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करणेत आलेला आहे.**

- जिल्हा परिषदे अंतर्गत ३९ गावाच्या सांडपाणी नदी पात्रात मिसळु नये व गावामध्ये जलजन्य आजार पसरु नये यासाठी दि.१९-११-२०१५ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य अधिकारी, गट विकास अधिकारी(करवीर, हातकणंगल व शिरोळ) कार्यकारी अभियंता ग्रापापु यांच्या समवेत आढावा घेवून सांडपाणी अडवणेसाठी बंधारे घालुन त्यास Chlorination करणे बाबत सुचना देणेत आलेल्या आहेत.

- जिल्हा परिषदेच्या अंतर्गत शहरालगतच्या गावांचे पाणी कोल्हापूर हद्दीमध्ये मिसळु नये यासाठी कळंबा, पाचगांव, मोरेवाडी, गांधीनगर, हनुमंतवाडी व शिंगणापूर गावांच्या ग्रामसेवका सोबत, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व) गट विकास अधिकारी, तालुका विस्तार यांना दि. १९-१२-२०१५ रोजी तात्पुरत्या / कायमस्वरुपी उपाययोजना करणेबाबत आढावा घेवून सुचना देणेत आल्या.

- मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिका १८३/२०१२ अन्वये असलेने NEERI या संस्थेस पंचगंगा खो-याचा अभ्यास करुन उचीत तांत्रिक पर्याय सुचवणेबाबत सुचीत केलेप्रमाणे Primove consultant, Pune यांनी पहिल्या टप्प्यातील ३९ गांवाचा सांडपाणी घनकचरा व्यवस्थापनाचा प्रस्ताव NEERI या संस्थेस सादर केलेनंतर दि.१५ मे २०१५ अन्वये cow dung, SIBF Tech, TWT from IIT Bombay व NG SEPCLEAN modified design of septic tank बाबत मुद्दे उपस्थित केलेप्रमाणे त्यास consultant मार्फत सदर मुद्याचे दि.२०-०६-२०१५ अन्वये निराकरण करणेत आलेले आहे.

- तद्नंतर NEERI या संस्थेने phytorid व इकडील कार्यालयाने प्रस्तावीत तंत्रज्ञान SIBF Tech वर Area req, capital cost, Civil cost, O & M, yearly power cost, annual repairs, chemical cost इ. बाबत तुलनात्मक सादरीकरण करुन उचीत निर्णय घेणेबाबत कळविलेले होते, यास अनुसरुन इकडील कार्यालयाच्या consultant मार्फत वरील सर्व मुदयाबाबत निरी या संस्थेस खुलासा करुन मा.विभागीय आयुक्त, पुणे यांच्या दि.०५-०८-१५ च्या आढावा बैठकीमध्ये सादरीकरण केलेले आहे.

- तद्नंतर NEERI या संस्थेने ग्रामीण भागांकरिता लोकसंख्येच्या आधारे short report on Tech options for villages in kolhapur मा.विभागीय आयुक्त यांना दि.०१ ऑक्टो २०१५ सादर करुन या प्रकारे उपाय योजना राबवणेबाबत सुचीत केलेले आहे. यामध्ये ० ते ५,०००, ५,००० ते १०,००० लोकसंख्येच्या गावामध्ये अदयावत सेप्टीक टॅक व बायोगॅस बांधणेत यावेत असे सुचविले आहे. व यापुर्वीच १५,००० हजार लोकसंख्येवरील ७ गावांपैकी

६ गांवे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोल्हापूर मार्फत NABARD अंतर्गत समाविष्ठ असुन त्यापैकी शिरोली तालुका हातकणंगले कामाची निविदा कार्यवाहीत आहे व उंचगांव ता. करवीर EDP अंतर्गत प्रस्तावीत आहे. तसेच १०,००० ते १५,००० लोकसंख्येच्या ७ गांवापैकी हातकणंगले ता.हातकंणगले EDP अंतर्गत प्रस्तावित असुन उर्वरीत ६ गांवे ही NABARD अंतर्गत समावेश करणेसाठी प्रयत्न करणेत येत आहेत.

- तथापि यास अनुसरुन देखील दि. ३ जानेवारी २०१६ अन्वये Primove concultant पुणे यांनी यापूर्वीच या गावामध्ये ८३% वैयक्तिक शैचालयाचे ( शोष खड्डे / सेप्टीक टॅक ) काम झालेले असुन १००% हागणदारी मुक्ततेकडे जिल्हा वाटचाल करत असलेने NEERI यांनी सुचविलेला तांत्रिक पर्याय संयुक्तीक वाटत नसलेने उचीत कमीत कमी खर्चाचा पर्याय सुचवणेबाबत इकडील कार्यालयाने दि.०५-०३-२०१६ अन्वये कळवलेले आहे.

- एकूणच ग्रामीण भागातील प्रस्तावीत मोठया रक्कमेच्या प्रकल्पाला निधी उपलब्ध होत नसलेने व तातडीने प्रदुषण कमी करणेच्या दृष्टीने मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी दि.०६-०१-२०१६ च्या आढावा बैठकीमध्ये निरीने कमी खर्चाची उपाययोजना सुचवावी असे निर्देश देणेत आले. यास अनुसरुन कमीत कमी खर्चाची उपयोजना सुचविनेबाबत दि.०५/०५/२०१६ अन्वये विनंती केलेली आहे.

- पंचगंगा प्रदुषण निर्मुलनाबाबत ग्रामीण भागामध्ये लोकसंख्यंच्या आधारे NEERI संस्थेने सुचवलेलया पर्यायानुसार इकडील प्रशासनामार्फत केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या वेळोवेळी प्राप्त मागदर्श सुचनेप्रमाणे संपुर्ण स्वच्छता अभियान / निर्मल भारत अभियाना अंतर्गत वैयक्तिक शैचालयाचे (Septic tank / Soak pits)काम कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये ८३% झालेले असलेने मा.विभागीय आयुक्त, पुणे यांच्या आढावा बैठक दि.०६-०१-२०१६ रोजी चर्चा अन्वये NEERI या संस्थेने सुचवलेला पर्याय संयुक्तिक होणार नसलेने फेर पडताळणी करुन कमीत कमी खर्चाची उपाय योजना सुचवणे बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २८/०७/२०१६ अन्वये अर्ध शासकीय पत्रान्वये कळवलेले आहे.

- शुन्य सार्वजनिक सांडपाणी या कल्पनेनुसार घरगुती व सार्वजनिक स्तरावर नांदेड पॅटर्न पध्दतीचे शोष खड्डे घेऊन जागचे जागी सांडपाणी व्यवस्थापनाचे करणे बाबत संबधित ग्रामपंचायतींना मार्गदर्शन व प्रशिक्षण देणेत आलेले आहे. तसेच सदर सांडपाणी परस बागेसाठी वापरणेसाठी ग्राम पंचायतीस उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) यांचेमार्फत कार्यशाळा घेवून मार्गदर्शन केलेले आहे.

- दै. सकाळ वर्तमान पत्रामध्ये वर्धापण दिना निमीत्य ग्रामीण भागातील जनतेस पंचगंगा प्रदुषण टाळणेसाठी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सुचनेप्रमाणे जाहिरात देवून जनजागृती करणेत आलेली आहे. तसेच दै. सकाळ समवेत उपक्रम राबवून शाळा महाविद्यालयाद्वारे परिक्षण, जनजागृती कार्यक्रमाची सुरुवात केलेली आहे.

- सालाबादाप्रमाणे याही वर्षी घरगुती व सार्वजनीक गणेश उत्सव २०१६ दरम्यान मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार मुर्ती / निर्माल्य कृत्रिम तलाव / कायली / कुंड मध्ये विसर्जीत करणेसाठी पंचगंगा खो-यातील १७४

गावांच्या सरपंच, ग्रामसेवक, गट विकास अधिकारी, उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांच्या समवेत दि.१९-०८-२०१६ मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवशीय कार्यशाळा घेवून १००% गणेश मुर्ती व निर्माल्य नदी पात्रात न करता उपलब्ध केलेल्या पर्यायी व्यवस्थेमध्ये करुन नदीचे पावित्र राखण्यासाठी नियोजन केले आहे. सदर कार्यशाळेस मा. जिल्हाधिकारी कार्यालय, मा. पोलिस अधिक्षक कार्यालय, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा परिषद पदाधिकारी व पर्यावरण मित्र उदय गायकवाड व मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व), मा. जिल्हा आरोग्य अधिकारी व मा.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात आले.

- तसेच रोटरी क्लब ऑफ करवीर, रोटरी क्लब चॅारिटेबल ट्रस्ट कोल्हापूर व जिल्हा माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळा दि.३१-०८-२०१६ घेवून पंचगंगा खोऱ्यातील १७४ गावातील माध्यमिक व प्राथमीक शाळेतील शिक्षकांना येणा-या घरगुती व सार्वजनीक गणेशउत्सव दरम्यान विद्यार्थाना प्रदुषणाबाबत जागृती करुन पर्यावरण पुरक गणेशउत्सव साजरा करणेसाठी व पंचगंगानदीचे प्रदुषण टाळणेसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

**सदयस्थितीत करावयाच्या उपाययोजना -**

१) **१०,००० वरील लोकसंख्या असलेल्या सर्व गावांचा नाबार्ड अंतर्गत समावेश करणेबाबतचा पाठपुरावा करणे**

२) **निरी या संस्थेकडून ० ते १०,००० पर्यंतच्या लोकसंख्येच्या गावामध्ये Septic tank मधून बाहेर पडणा-या पाण्यावर किमान खर्चाची उपाययोजना घेवून उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता विभागामार्फत उपलब्ध निधीतुन करणे शक्य आहे.**

३) **संबंधीत गावातील काही प्रमाणांत केलेल्या तात्पुरत्या उपाययोजना आहेत व आणखी आवश्यक करावयाच्या उपाययोजनांची उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता विभागामार्फत तातडीने अंमलबजावणी करणेत येवून त्याचा नियमित आढावा घेऊन पुर्ण करणेत यावी.**